# प्रेस नोट

दिनांक :- २३/०७/२०२६

आरोपी लोकसेविका श्रीमती. शकुंतला जयवंत ईंगोले, वय ५७ वर्ष, पद- पर्यवेक्षिका तथा अतिरिक्त कार्यभार बाल विकास प्रकल्प अधिकारी, नेम- एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालय, महागांव जि.यवतमाळ वर्ग-३ , यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यवतमाळ, यांनी रंगेहाथ पकडलेबाबत...

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | यवतमाळ युनिट |
| पो.स्टे व गुन्हा नोंद क्रमांक व कलम | पो.स्टे. महागांव अप क्र. ३९८/२०२६ जिल्हा यवतमाळ, कलम ७, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | आरोपी लोकसेविका श्रीमती. शकुंतला जयवंत ईंगोले, वय ५७ वर्ष, पद- पर्यवेक्षिका तथा अतिरिक्त कार्यभार बाल विकास प्रकल्प अधिकारी, नेम- एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालय, महागांव जि.यवतमाळ वर्ग-३ |
| मागितलेली लाचेची रक्कम | १०,००० रु |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | पहिला हप्ता ५,००० /- रूपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांनी एकात्मीक बाल विकास सेवा योजने अंतर्गत अंगणवाडी मदतनीस पदासाठी अर्ज केला होता. संबंधीत पदावर निवड होण्यासाठी आरोपी लोकसेविका यांनी १०,०००रु लाचेची मागणी केली होती. तक्रारीचे अनुषंगाने दि.२२/०७/२०२६ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी मध्ये आरोपी यांनी तडजोडीअंती प्रथम हप्ता म्हणून ५०००रु. व काम झाल्यानंतर उर्वरीत ५०००रु असे एकुण १००००रु. पंचासमक्ष स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले, त्यानुसार त्याच दिवशी सापळा कारवाई आयोजित करण्यात आली. तक्रारदारास पंचासोबत आरोपी यांच्या महागांव येथील राहत्या घरी पाठविण्यात आले. आरोपी लोकसेविका यांनी त्यांच्या राहत्या घरातील स्वयंपाकघरात तक्रारदाराकडुन प्रथम हप्ता ५०००रु पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,यवतमाळ तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ येथे संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ, दगडी इमारत, टांगा चौक यवतमाळ

संकेत स्थळ :- dyspacbyavatmal@mahapolice.gov.in

टोल फ्री क्रमांक :- १०६४ दुरध्वनी क्रमांक :- ०७२३२- २४४००२/८९७५७९१०६४

श्री. अभय आष्टेकर, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. यवतमाळ मो.नं. ८२७५०८८७९७

श्री.अर्जुन घनवट,पोलीस निरीक्षक ,ला.प्र.वि.यवतमाळ.मो.नं.९६२३१०१७०६

श्री.मनोज ओरके ,पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.यवतमाळ.मो.नं.८८५५०८०००७

(अभय आष्टेकर)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ